# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र

## गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ०५ /२०२१ दिनांक : १५ /०१ /२०२१

कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९ /०१ /२०२० ते १५ /०१ /२०२१) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६ /०१ /२०२१ सकाळी ८:३० पासून २० /०१ /२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ | १४/०१ | १५/०१ | | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ | २०/०१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३० | ३०.४ | ३०.४ | ३१.६ | ३१.६ | ३१ | ३० | कमाल तापमान (अं.से) | २८ | २९ | २९ | २९ | २९ |
| २१ | २१.४ | २२ | २२ | २१ | १९ | १९ | किमान तापमान (अं.से) | १८ | १८ | १८ | १८ | १७ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | अंशत ढगाळ | अंशत ढगाळ | अंशत ढगाळ | स्वछ | स्वछ |
| ९१ | ७१ | ६४ | ८५ | ८६ | ९० | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५८ | ५९ | ५८ | ५५ | ४७ |
| ६३ | ५५ | ५६ | ६६ | ६० | ५७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३४ | ३० | ३१ | ३३ | ३८ |
| ४.२ | ४.९ | ४.५ | ५ | ५.१ | ३.७ | २.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ३ | ४ | ५ | ५ |
| पू. | ई प. | ई पू. | पू. | आ. | पू. | - | वाऱ्याची दिशा | ई. पू. | ई. | आ. | ई पू. | ई. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३११५.२ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| | |
|---|---|
| हवामान पूर्वानुमान | प्रादेशिक हवामान विभाग मुंबई , द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक १६ जानेवारी ते २० जानेवारी, २०२१ दरम्यान किमान तापमानात घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तसेच पुढील तीन दिवस आकाश ढगाळ राहील. |
| सामान्य सल्ला | आंबा मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी. |
| संदेश | कीडनाशकांची व बुरशीनाशक औषधांची फवारणी करताना संरक्षक साधनांचा वापर करून फवारणी करावी. |

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पुर्नलागवड | • भात रोपवाटीकेला गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. भात रोपांच्या पुर्नलागवडीसाठी पारंपरिक पद्धतीने किंवा यंत्राच्या साहाय्याने चिखलणी करावी. पारंपरिक पद्धतीने चिखलणी करण्यासाठी बैल चलित पंकज चिखलणी अवजाराचा वापर करावा. श्रम कमी करण्यासाठी पॉवर टीलर किंवा ट्रॅक्टरला लोखंडी चाके लावून रोटॅव्हेटरच्या मदतीने चिखलणी करावी.<br>• भात क्षेत्रातील बांधाची बांध बंधीस्ती करून घ्यावी, २२ ते २५ दिवस झालेली भाताची रोपे १२ ते १५ से. मी. उंच झाल्यानंतर लागवड करावी. भाताची पुर्नलागवड |

| | | |
|---|---|---|
| | | दोन ओळीमध्ये २० से. मी. तर दोन रोपांमध्ये १५ से. मी. अंतर ठेवून २.५ ते ३.५ से. मी. खोलवर करावी. |
| **उन्हाळी भुईमूग** | **पेरणी** | ✚ उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी नंतर करून घ्यावी, पेरणी करताना उपट्या जातीच्या बियाणाची ३० x १० सेमी अंतरावर लागवड करावी तसेच पेरणी पूर्वी भुईमुगाच्या एक किलो बियाणास ३ ग्रॅम थायरम किंवा ट्रायकोडरमा या जैविक बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करावी जेणेकरून बुरशीजन्य रोगापासून पिकांचे नुकसान होत नाही. व त्यानंतर १० किलो बियाणास २५० ग्रॅम या प्रमाणात रायझोबियम या जिवाणू संवर्धन खताची प्रक्रिया करावी. |
| **वाल** | **फुलोरा ते फळ धारणा** | ✚ फुलोरा अवस्थेत असलेल्या वाल पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, या आळीच्या नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **तूर** | **काढणी अवस्था** | ✚ तुरीच्या शेंगा वाळल्यावर पीक कापून घ्यावे. खळ्यावर मळणी करावी. तूर पिकाचा खोडवा घेऊ नये. खोडवा घेतल्यास वांझ या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. साठवणुकीपूर्वी तूर धान्य ५ ते ६ दिवस चांगले उन्हात वाळवून पोत्यात किंवा कोठीत साठवावे. शक्य असल्यास कडुनिंबाचा पाला ५ टक्के प्रमाणात धान्यात मिसळून धान्य साठवावे. धान्याची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| **चिकू** | **काढणी अवस्था** | ✚ चिकूची काढणी करताना फळे परिपक्व झालेली असावीत, तसेच फळे काढणी झाल्यावर प्रतवारी करूनच विक्रीला पाठवावी. नवीन लागवड केलेल्या चिकूच्या प्रत्येक कलमास अर्धा घमेले शेणखत, १५० ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्पेट, व ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश जानेवारी मध्ये द्यावे. ही खते चरातून बांगडी पद्धतीने प्रति झाडास द्यावीत. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | ✚ तापमानात घट संभवत असल्याने केळी बागेस ५ ते ७ संध्याकाळच्या वेळेस पाणी देण्याची व्यवस्था करावी जेणेकरून बागेतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. तसेच पाणी देण्यासाठी सुधारित सिंचन पद्धतीचा वापर करावा. |
| **काजू** | **मोहोर अवस्था** | ✚ मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच फळधारणा झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | ✚ तापमानात घट संभवत असल्याने नारळ व सुपारी बागेस संध्याकाळच्या वेळेस पाणी देण्याची व्यवस्था करावी जेणेकरून बागेतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होईल. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था** | ✚ ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने आंबा पालवी आणि मोहोरावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३% या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>✚ मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.) |

| | | |
|---|---|---|
| मोगरा | वाढीची अवस्था | जानेवारी महिन्यामध्ये मोगरा झाडांची छाटणी केल्याने नवीन फुट वाढून फूल उत्पादनात वाढ होते. छाटणी करून १ % बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी किंवा कापलेल्या फांदीवर बोर्डो पेस्ट लावावे. |
| कोबी | वाढीची अवस्था | कोबी पिकामध्ये मावा, लाल कोळी किडीचा प्राद्र्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १० मि.ली. ५० टक्के मॅलेथीऑन प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १० ते १२ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. |
| टोमॅटो | फुलोरा ते फळ धारणा | टोमॅटो पिकावर फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, या आळीच्या नियंत्रणासाठी एच. एन. पी. व्ही. २५० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच प्रादुर्भित फळांसह अळया गोळा करून नष्ट कराव्यात. |
| कुकुट पालन | | बर्ड फ्लू या आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आजारी असलेल्या पक्षाना जवळच्या पशु वैद्यकीय दवाखाण्यात दाखवून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:८५५२८८२७१२**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई**

२) **मागील हवामान : भात संशोधन केंद्र, पालघर**

**ठिकाण** : **कृषि विज्ञान केंद्र पालघर**

**दिनांक : १५.०१.२०२०**

**स्वक्षरित**

**प्रमुख अन्वेषक,**

**ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**